दैनिक
जनशक्ती
दि. २६ ऑगस्ट, २०२४

# महिलांवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला जन्मठेप किवा फाशीची शिक्षा होणारच

## जळगावच्या लखपती दिदी कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे वक्तव्य

। जळगाव ✍ प्रतिनिधी।

देशातील महिलांना प्रतिभावंत व सुरक्षित ठेवण्यासाठी आमचे प्रयत्न आहेत. देशातील कोणत्याही राज्यात असो, महिलांविरुद्ध होत असलेला अपराध हा अक्षम्य पाप आहे. जो अपराधी आहे तो वाचला नाही पाहिजे. मग त्यामध्ये पोलीस असो, अधिकारी असो, राजकीय असो किंवा कोणी असो वरीष्ठ पातळीपासून तर सर्व स्तरापर्यंत हा मेसेज गेलाच पाहिजे की, महिलांवर अत्याचार करणार्या आरोपीला शिक्षा होणारच. देशातील प्रत्येक राज्याला आम्ही यासाठी आमचे संपूर्ण सहकार्य असणार आहे. यासाठी आम्ही भारतीय न्याय संहिता मध्ये बदल केलेले आहेत. तर अत्याचार करणाऱ्याला जन्मठेप किंवा फाशीची शिक्षा ठेवली आहे, असे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लखपती दिदी कार्यक्रमावेळी बोलताना केले.

जळगाव येथील प्राइम इंडस्ट्रियल पार्क या ठिकाणी दुपारी १२.४२ वाजेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ओपन जीपमधून भगिनींना अभिवादन करत कार्यक्रम स्थळी आगमन झाले. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्ण, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज चव्हाण, दूरसंचार मंत्री डॉक्टर पेम्मासवामी चंद्रशेखर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, केंद्रीय राज्यमंत्री कमलेश पासवान, आदिवासी विकास मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, खासदार स्मिता वाघ, पालकमंत्री गुलाबराव पाटील, नामदार गिरीश महाजन नामदार, अनिल पाटील, आमदार संजय सावकारे, आमदार राजू मामा भोळे, आमदार किशोर पाटील यांची उपस्थिती होती.



### महिला ईएफआयआर दाखल करू शकतात

» **ज्या महिलेवर** अत्याचार झाला असेल, ती जर पोलीस स्टेशनमध्ये येऊ शकत नसेल तर तिने ई एफ आय आर करावे. त्यासाठी भारतीय न्याय संहितेत महिलांवरील अत्याचारमध्ये फाशी आणि जन्मठेपेची शिक्षा ठेवण्यात आली असल्याचे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लखपती दीदी या कार्यक्रमात बोलताना सांगितले.



» **लखपती** दीदी या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला भगीनी व मुली यांना आर्थिक बळ देण्यासाठी आमचे सरकार प्रयत्न करीत असल्याचे मोदींनी सांगितले. २०१४ च्या पूर्वी महिलांसाठी फक्त २५००० करोड रुपये बँक लोन सखी मंडळांना देण्यात आले. मात्र भाजपा सरकारच्या दहा वर्षाच्या काळात नऊ लाख करोड ची मदत सखी मंडळांना करण्यात आलेली आहे. सरकार मदत करत आहे. गाव गावातील महिलांचे उत्पन्न वाढत आहे त्यामुळे देश मजबूत होत आहे.

» **१२५ आर्थिक** बँक सखी गावागावात जाऊन काम करीत आहेत. महिला २०० माध्यमातून आधुनिक शेती करण्यास मदत करीत आहे तर दोन लाख पशु सखींना ट्रेनिंग देत पशुपालकांना मदत करणार आहे असे पंतप्रधान यांनी यावेळी सांगितले. फॅक्टरी कृषी डेअरी देखील मोठ्या प्रमाणात मुलींना प्रशिक्षण देत आहेत. नारी शक्ती बंधन कायदा करून मोठ्या प्रमाणात महिलांना राजकारणात देखील प्रवेश दिला जात आहे. महिलांच्या सुरक्षेबाबत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, महिलांविरुद्ध होत असलेला अपराध अक्षम्य आहे. महिलांची गरिमा राखण्यासाठी अधिकाधिक कायदे कडक करण्यात येत आहे.